# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
## १७ आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/कोरोना/२०२० /861 दि.१६/०३/२०२०

प्रति, **महत्वाचे/ई-मेलद्वारे**

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
३) कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
४) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
५) कुलसचिव/संचालक, सर्व स्वयं अर्थसहाय्यीत/अभिमत विद्यापीठे, पुणे/अहमदनगर/नाशिक.
६) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७) प्राचार्य/प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानि/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ स्वायत्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

**विषय:- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत...**

संदर्भ:- १) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण, क्र.संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दि.१६/०३/२०२०.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१५/०३/२०२०.
३) मा.संचालनालयाकडील क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/३८१९, दि.१६/०३/२०२०.

उपरोक्त विषयाबाबतची संदर्भिय पत्रे व त्यासोबतची सहपत्रे अवलोकनी घ्यावीत.(प्रती संलग्न)

सार्वजनिक आरोग्य विभागाने संदर्भाधिन पत्र क्र.२ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुसरुन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भ क्र.१ अन्वये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या दि.१४/०३/२०२० व दि.१५/०३/२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता, नागरी भागासोबतच राज्यातील ग्रामीण भागातील सर्व सरकारी/ अनुदानित/ खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषि विद्यापीठे/ वसतीगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.
२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठे/ सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/ सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/वसतिगृहे दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.
३) राज्यातील सर्व सरकारी/ अनुदानित/ खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषि विद्यापीठे यांच्या दि.३१/०३/२०२० पर्यंत होणाऱ्या सर्व परीक्षा व प्रात्यक्षिके पुढे ढकलण्यात येत आहेत. दि.०१/०४/२०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.